संक्षिप्त

दुसरे राज्यस्तरीय महिला साहित्य संमेलन रविवारी

पुणे : 'आम्ही सिद्ध लेखिका'च्या पुणे विभागातर्फे दुसऱ्या राज्यस्तरीय महिला साहित्य संमेलनाचे आयोजन केले आहे, अशी माहिती संस्थेच्या कार्याध्यक्षा सविता इंगळे, उपाध्यक्षा मीना शिंदे आणि कल्पना देशपांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. हे एकदिवसीय संमेलन रविवारी (दि.२१ एप्रिल) होणार असून, अध्यक्षपदी ज्येष्ठ लेखिका डॉ. अरुणा ढेरे यांची निवड केली आहे. हे संमेलन सकाळी ९ ते सायंकाळी ७ या वेळेत गणेश हॉल, न्यू इंग्लिश स्कूलमध्ये होणार आहे. या संमेलनात परिसंवाद, प्रकट मुलाखत, काव्य संमेलन आणि गझल मुशायरा असे वैविध्यपूर्ण कार्यक्रमांची पर्वणी रसिकांना मिळणार आहे. संमेलनाचे उद्घाटन संस्थेच्या ठाणे जिल्हा विश्वस्त उषा चांदुरकर यांच्या हस्ते सकाळी ९.३० वाजता होणार असून, या वेळी संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. अरुणा ढेरे, स्वागताध्यक्ष कायदेशीर सल्लागार ॲड. प्रार्थना सदावर्ते, मा. पद्मा हुशिंग, ज्योत्स्ना चांदगुडे यांसह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. ज्येष्ठ साहित्यिक आणि अनुवादक डॉ. उमा कुलकर्णी यांची प्रकट मुलाखत वासंती वर्तक आणि कल्पना देशपांडे घेणार असून, स्नेहल पाठक यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलन होणार आहे. मानसी जोशी यांच्या अध्यक्षतेखाली गझल मुशायरा होणार असून, प्रमुख पाहुण्या म्हणून सुनेत्रा जोशी उपस्थित राहणार आहेत. यामध्ये नीलिमा ताटके, रेखा येळंबकर, साधना ओगले, ज्योती वाघ, मुक्ता आगाशे, ज्योत्स्ना तानवडे सहभागी होणार आहेत. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. स्नेहसुधा कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली 'स्त्री साहित्य बोल्ड झाले आहे का?' या विषयावर परिसंवाद होणार आहे. यामध्ये अश्विनी निवर्गी, अर्चना संबरकर सहभागी होणार असून, त्यांच्याशी लीना दामले संवाद साधणार आहेत.

एमएच-डीपीएन-पीएचएन सीईटी नोंदणीला सुरुवात

पुणे : राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष अर्थात सीईटी सेलतर्फे शैक्षणिक वर्षे २०२४-२५ करीता पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश परीक्षा घेण्यात येत आहेत. एमएच-डीपीएन-पीएचएन सीईटी - २०२४ प्रवेश परीक्षेसाठी १६ एप्रिलपासून अर्ज नोंदणीला सुरुवात झाली आहे, तर अर्ज भरण्यासाठी ३० एप्रिलपर्यंत मुदत देण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये शुश्रुषा संवर्गाशी संबंधित मनोरुग्णतज्ज्ञ परिचारिका (डी.पी.एन.) व सार्वजनिक आरोग्य परिचारिका (पी.एच.एन.) या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी एमएच-डीपीएन-पीएचएन सीईटी - २०२४ प्रवेश परीक्षा सीईटी सेलमार्फत घेण्यात येणार आहे. इच्छुक उमेदवार सीईटी सेलच्या अधिकृत संकेतस्थळ www.mahacet.org वर अर्ज भरू शकतात. मनोरुग्णतज्ज्ञ परिचारिका (डी.पी.एन.) व सार्वजनिक आरोग्य परिचारिका (पी.एच.एन.) या प्रवेश परीक्षेसाठी राज्यातील मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर या चार जिल्ह्यांतील विविध परीक्षा केंद्रावर ऑनलाइन पद्धतीने ही परीक्षा घेण्यात येणार असल्याचे सीईटी सेलने जाहीर केले आहे. अधिक आणि सविस्तर माहितीसाठी सीईटीसेलच्या संकेतस्थळाला भेट द्यावी, असेदेखील स्पष्ट केले आहे.

राज्यात हिमोफिलियावरील औषधांचा तुटवडा?

प्रज्ञा केळकर- सिंग
पुढारी प्रतिनिधी

पुणे : राज्यात हिमोफिलिया या जनुकीय आजाराचे सुमारे ५ हजार रुग्ण आहेत. रुग्णांना लागणाऱ्या फॅक्टर ७, ८, ९ आणि फिबा या औषधांचा मागील महिन्यात तुटवडा निर्माण झाला होता. मात्र, आता केंद्र शासनाकडून १५ हजार व्हायल मिळाल्याने तुटवडा दूर झाल्याचा दावा आरोग्य विभागाने केला आहे. मात्र, प्रगत देशांमध्ये वापरले जाणारे हेमलिब्रा हे इंजेक्शन उपलब्ध करून देण्यात अद्याप अडचणी येत आहेत.

रक्ताशी संबंधित आजारांपैकी एक म्हणजे हिमोफिलिया. या समस्येवर योग्यवेळी उपचार न केल्यास ती जीवघेणी ठरू शकते. हिमोफिलियाबद्दल जनजागृती करण्याच्या उद्देशाने दरवर्षी १७ एप्रिल रोजी 'जागतिक हिमोफिलिया दिन' साजरा केला जातो. शस्त्रक्रियेनंतर रक्तस्राव न थांबणे, अंतर्गत रक्तस्रावामुळे सांध्यांवर परिणाम होणे किंवा किरकोळ जखमेमुळे सुरू झालेला रक्तस्राव न थांबणे अशा लक्षणांमधून हिमोफिलिया आजाराचे निदान होते.

जनुकांमधील फॅक्टर ८ किंवा ९ मधील परिवर्तनामुळे हिमोफिलिया होण्याची शक्यता वाढते. रक्त गोठण्यासाठी आवश्यक असलेल्या फॅक्टर ८ च्या कमतरतेमुळे आजाराला आमंत्रण मिळते. हिमोफिलियाच्या रुग्णांना फॅक्टर थेरपी दिली जाते. औषधांची नवीन खरेदी करताना आलेल्या

हिमोफिलिया दिन विशेष

अडचणी किंवा उत्पादक पातळीवर काही अडचण निर्माण झाल्यास औषध पुरवठ्यावर परिणाम होतो, असे आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

हिमोफिलियासाठी लागणाऱ्या औषधाच्या एका युनिटची किंमत १५ रुपये इतकी आहे. रुग्णाच्या वजनानुसार, एका वेळी २० युनिट औषध द्यावे लागते. म्हणजेच ५० किलो वजनाच्या माणसाला १००० युनिटचे इंजेक्शन लागते. शासकीय रुग्णालयांमध्ये मोफत औषध उपलब्ध न झाल्यास आणि वेळेवर इंजेक्शन न मिळाल्यास जीवघेणा रक्तस्राव होऊ शकतो.

रुग्णांच्या उपचारांवर होतो परिणाम

राज्यात हिमोफिलिया रुग्णांना औषधांचा कायम तुटवडा जाणवतो. बरेचदा शासकीय रुग्णालयांमध्ये फॅक्टर ९ चे इंजेक्शन उपलब्ध नसल्याने रुग्णांवर हाल होतात. जगभरात हेमलिब्रा हे औषध उपयुक्त ठरत आहे. मात्र, राज्य सरकारने अद्याप हे औषध उपलब्ध करून दिलेले नाही. निधीचा तुटवडा असल्याचा परिणाम रुग्णांच्या उपचारांवर होतो.

"हिमोफिलिया रुग्णांच्या मागणीप्रमाणे औषधांचा पुरवठा जिल्ह्यानुसार फेरबदल केले जातात. राज्याला केंद्र शासनाकडून नुकत्याच १५ हजार व्हायल मिळाल्या आहेत. आत्तापर्यंत राज्यात केवळ ९ ठिकाणी हिमोफिलिया सेंटर होती. आता आणखी नवीन २७ ठिकाणी केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. त्यामुळे रुग्णांना तालुक्याच्या ठिकाणी सहज उपचार मिळू शकणार आहेत. प्रत्येक केंद्राला १००० व्हायल पाठवण्यात आल्या आहेत.

- डॉ. महेंद्र केंद्रे,
सहायक संचालक, सार्वजनिक आरोग्य विभाग

"युरोप, फ्रान्स, अमेरिका या देशांमध्ये रुग्णांमध्ये रक्तस्राव होऊ नये, यासाठी प्रॉफिलॅक्सिस उपचार पद्धतीने इंजेक्शन दिले जाते. आपल्याकडे शासनाची उदासीनता, आजारांचे न कळलेले गांभीर्य, निधीचा अभाव आदी कारणांमुळे असे उपचार उपलब्ध करून दिले जात नाहीत. याबाबत हिमोफिलिया सोसायटीकडून अनेकदा शासनाला विनंतीपत्र देण्यात आले आहे. मात्र, आश्वासनांच्या पलीकडे कोणतेही पाऊल उचलले जात नाही.

- डॉ. सुनील लोहाडे,
उपाध्यक्ष, हिमोफिलिया सोसायटी, पुणे

ईव्हीएम हाताळण्याचे प्रशिक्षण...

लोकसभा निवडणुकीसंबंधी ईव्हीएम मशिन हाताळण्याचे प्रशिक्षण अधिकारी, कर्मचाऱ्यांना गणेश कला क्रीडा मंचमध्ये मंगळवारी देण्यात आले. या वेळी आवश्यक साहित्यांची जुळवाजुळव करण्यात आली. (छाया : अनंत टोले)

राज्यात आरटीई प्रवेश नोंदणीला सुरुवात

पहिल्याच दिवशी दीड हजारांवर विद्यार्थ्यांनी भरले अर्ज

पुणे : पुढारी वृत्तसेवा

शिक्षण हक्क कायद्यानुसार वंचित, दुर्बल, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास घटकांतील विद्यार्थ्यांना आरटीईअंतर्गत प्रवेश दिले जातात. त्यासाठी नोंदणी सुरू झाली असून राज्यात पहिल्याच दिवशी १ हजार ५१३ विद्यार्थ्यांचे अर्ज पालकांनी भरले असल्याचे स्पष्ट झाले आहे.

विद्यार्थ्यांचे अर्ज येत्या ३० एप्रिलपर्यंत त्यांच्या पालकांना भरता येणार असल्याचे प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे संचालक शरद गोसावी यांनी स्पष्ट केले आहे.

शालेय शिक्षण विभागाने यंदा आरटीई प्रवेश प्रक्रियेत बदल केला आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांच्या निवासस्थानापासून एक किलोमीटरपर्यंतच्या अंतरावर अनुदानित शाळा, शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांची शाळा नसल्यासच एक किलोमीटरच्या अंतरावरील स्वयंअर्थसहाय्यित शाळेत प्रवेश दिला जाणार आहे. शाळा निवडताना अनुदानित शाळा, शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा आणि त्यानंतर स्वयंअर्थसहाय्यित शाळा या प्राधान्यक्रमानुसार प्रवेश दिला जाणार आहे. एखाद्या पालकाला प्राधान्यक्रम म्हणून अनुदानित शाळेऐवजी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेची किंवा शासकीय शाळेची निवड करायची असल्यास पालकाच्या प्राधान्यक्रमानुसार संबंधित शाळा निवडता येणार आहे.

आरटीई प्रवेश प्रक्रियेत केलेल्या बदलामुळे यंदा मोठ्या प्रमाणात जागा वाढल्या आहेत. राज्यभरातील ७६ हजार ३० शाळांमध्ये ८ लाख ८६ हजार १०९ जागा प्रवेशासाठी उपलब्ध झाल्या आहेत. पुण्यात ५ हजार १८७ शाळांमध्ये ७२ हजार ९६८ जागा उपलब्ध आहेत. त्यापैकी पहिल्याच दिवशी ४४३ विद्यार्थ्यांचे अर्ज भरले गेल्याचे स्पष्ट झाले आहे.

निरंजन राजे जाधवराव, हर्षद घोगरे यांचे यूपीएससीत यश

निरंजन जाधवराव

हर्षद घोगरे

शिवनगर / बावडा : पुढारी वृत्तसेवा

बारामती तालुक्याच्या माळेगावमधील निरंजन महेंद्रसिंह राजे जाधवराव हे २८७ रँक मिळवून तर इंदापूर तालुक्याच्या बावडामधील हर्षद भगवान घोगरे हे ३०८ व्या रँकने यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाले. या यशाबद्दल बारामती व इंदापूर तालुक्यातून त्यांचे कौतुक होत आहे.

बारामती तालुक्याच्या माळेगावमधील निरंजन महेंद्रसिंह राजे जाधवराव याने यूपीएससी परीक्षेमध्ये २८७ रँक मिळवून यश संपादन केले. या यशाबद्दल बारामती तालुक्यातून त्यांचे कौतुक केले जात आहे.

निरंजन हा सोमेश्वरनगरमधील मुगुटराव साहेबराव काकडे महाविद्यालयाचे निवृत्त प्राध्यापक महेंद्रसिंह राजे जाधवराव यांचा मुलगा आहे. निरंजन म्हणाला, अभ्यासात सातत्य असेल आणि चालू घडामोडी ज्ञात असतील तर यश नक्की मिळते. माझ्या यशात आई - वडील, शिक्षकांचे मार्गदर्शन मिळाले. ग्रामीण भागातील तरुणांनी या परीक्षेची भीती न बाळगता मनापासून व खडतर प्रयत्न करून अभ्यास केल्यास त्यांनाही यश मिळेल, असा विश्वासही त्याने व्यक्त केला.

तसेच, इंदापूर तालुक्याच्या बावडामधील हर्षद भगवान घोगरे हे ३०८ व्या रँकने यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाले. केंद्रीय लोकसेवा आयोगाने सन २०२३ मध्ये झालेल्या परीक्षेचा निकाल मंगळवारी (दि.१६) दुपारी जाहीर केला.

घोगरे यांनी यापूर्वी २०२१ मध्ये यूपीएससी परीक्षा सन ६१४ रँकने उत्तीर्ण होत यश संपादन केले. सध्या घोगरे हे भारतीय नागरी लेखा सेवा या पदाचे प्रशिक्षण घेत आहेत. प्रशिक्षण घेत असतानाच घोगरेने यूपीएससी परीक्षा पुन्हा देत ३०८ वी रँक प्राप्त केली. हर्षद घोगरे यांचे वडील भगवान घोगरे हे सेवानिवृत्त ग्रामविकास अधिकारी आहेत.

महाविकास आघाडीचे तीनही उमेदवार गुरुवारी अर्ज भरणार

पुणे : पुढारी वृत्तसेवा

महाविकास आघाडीच्या बारामती लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवार सुप्रिया सुळे, शिरूर लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे व पुणे लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार रवींद्र धंगेकर गुरुवारी (दि. १८) उमेदवारी अर्ज दाखल करणार असून, या वेळी महाविकास आघाडीच्या वतीने भव्य शक्ती प्रदर्शन करण्यात येणार आहे.

महाविकास आघाडीच्या वतीने १८ एप्रिल रोजी सकाळी साडेदहा वाजता विभागीय आयुक्त कार्यालय तथा जिल्हाधिकारी कार्यालय येथे सुप्रिया सुळे, डॉ.अमोल कोल्हे, रवींद्र धंगेकर हे महाविकास आघाडीचे तीनही उमेदवार उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. त्यानंतर रास्ता पेठेतील हॉटेल शांताईसमोर महाविकास आघाडीची भव्य सभा होणार असून, शरदचंद्र पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खा. संजय राऊत, बाळासाहेब थोरात, अजित फटके हे दिग्गज नेते पुण्यातून विजयाचे रणशिंग फुंकणार आहेत, असे राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी कळविले आहे.

अजित पवार, सुनंदा पवार यांनीही घेतला अर्ज

पुणे : पुढारी वृत्तसेवा

लोकसभा निवडणूक जवळ येत असताना आणखी ट्विस्ट बघायला मिळण्यास सुरुवात झाली आहे. पहिल्यांदा बारामतीसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाने अर्ज घेऊन गेल्यानंतर लगोलग आमदार रोहित पवार यांच्या आई सुनंदा पवार यांच्या नावाचा देखील उमेदवारी अर्ज घेण्यात आला आहे. त्यामुळे खासदार सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार या नणंद- भावजयच्या लढतीमध्ये पवार कुटुंबामधील इतर दोघांनी देखील उमेदवारी अर्ज घेतल्याने राजकारण नेमके कुठे चाललेय असा प्रश्न नागरिकांना पडलाय.

नणंद-भावजयच्या लढतीत नवा ट्विस्ट

पक्ष फुटल्यानंतर पवार कुटुंब शरद पवार यांच्या बाजूने उभे राहिले आणि जाहीरपणे प्रचार करण्यास सुरुवातही केली. परिणामी, बारामती लोकसभा ही आणखीच प्रतिष्ठेची झाली. महाविकास आघाडीच्या उमेदवार सुप्रिया सुळे आणि महायुतीच्या सुनेत्रा पवार या येत्या गुरूवारी (दि. १८) उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

तत्पूर्वीच अजित पवार यांच्यासह सुनंदा पवारांनीही उमेदवारी अर्ज घेतल्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. दरम्यान, सुनेत्रा पवार यांच्या अर्जात काही चूक झाल्यास तो अर्ज बाद होऊ शकतो. त्यामुळे खबरदारी म्हणून अजित पवार यांच्यासह तीन उमेदवारी अर्ज घेण्यात आले आहेत. अशाच प्रकारची खबरदारी सुप्रिया सुळे यांच्या बाबतीतही घेतल्याचे सांगितले जात आहे. म्हणून सुनंदा पवार यांनीही निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून बारामती लोकसभा मतदारसंघासाठी अर्ज घेतला आहे. लक्ष्मीकांत खाबिया यांनी सुनंदा पवार यांच्यासाठी अर्ज घेतला आहे, असे सांगण्यात आले.

'बारामती'साठी बारा उमेदवारांचे अर्ज दाखल

पुणे : पुढारी वृत्तसेवा

बारामती लोकसभा मतदारसंघात मंगळवारअखेर (दि.१६) १२ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. तर ७७ जणांनी अर्ज नेले आहेत. बारामती लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी १९ एप्रिल ही शेवटची तारीख आहे.

७७ जणांनी नेले अर्ज : १९ एप्रिल शेवटची तारीख

बारामती लोकसभा मतदारसंघासाठी १३ एप्रिलपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे. आतापर्यंत केवळ अपक्ष उमेदवारांनीच अर्ज दाखल केले आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या पहिल्या दिवशी केवळ एकाच उमेदवाराने अर्ज दाखल केला. तर १२ जणांनी अर्ज नेले होते.

गेल्या तीन दिवसांत ७७ जणांनी उमेदवारी अर्ज नेले, तर १२ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. राजकीय पक्षाचे उमेदवार १८ एप्रिल रोजी उमेदवारी अर्ज भरणार आहेत.

माझे बोट धरून मोदी राजकारणात आले, यावर विश्वास कसा ठेवायचा?

इंदापूर : पुढारी वृत्तसेवा

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बारामतीत येऊन भाषणात सांगितले, की शरद पवार यांचे बोट धरून मी राजकारणात आलो. ही मोठी गमतीची गोष्ट आहे. देशाचे पंतप्रधान माझे बोट धरून राजकारणात येतात यावर कसा विश्वास ठेवायचा? अनेक गोष्टी त्यांनी सांगितल्या, अनेक आश्वासने त्यांनी दिली, परंतु त्याची पूर्तता काही त्यांनी केली नाही, अशी टीका राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर केली. मंगळवारी (दि. १६) इंदापूरमध्ये जाहीर सभेत शरद पवार बोलत होते.

शरद पवार यांची नरेंद्र मोदी यांच्यावर टीका

पवार म्हणाले की, देशाची सत्ता कोणाच्या हातामध्ये द्यायची आहे, याचा निर्णय आपल्याला घ्यायचा आहे. ज्या कुटुंबाने अनेक वर्षे देशाच्या स्वातंत्र्याआधी व देश स्वतंत्र झाल्यानंतर देशाची सेवा केली, अशा कुटुंबाच्या हातात देशाची सत्ता द्यायची की, माणूस, जात, धर्म, भाषांमध्ये दुरावा वाढविण्यासाठी सत्तेचा गैरवापर ज्यांनी केला, त्यांच्या हातात सत्ता द्यायची? मी अनेक राज्यांत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत जात असतो.

मी बघतोय की या वेळी लोकांची मन:स्थिती वेगळी दिसत आहे. आता लोकांच्या लक्षात आले आहे की या देशाची सत्ता पुन्हा मोदींच्या हातात द्यायची नाही. जे भ्रष्टाचारी आहेत त्यांना जवळ घेतात. मोदींच्या पक्षात घेतात आणि त्यांना स्वच्छ करतात. आज मोदींचे सरकार भ्रष्टाचाऱ्यांना स्वच्छ करण्याचे 'क्लिनिंग मशिन' झालं आहे.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

६० वा महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार
प्रवेशिका

मुदतवाढ जाहिरात

६० वा महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांसाठी दिनांक ०१ जानेवारी २०२२ ते ३१ डिसेंबर २०२२ या कॅलेंडर वर्षात सेन्सॉर संमत झालेल्या मराठी चित्रपटांच्या प्रवेशिका **दिनांक १७.०४.२०२४ ते दिनांक ३१.०५.२०२४** पर्यंत निर्मात्यांकडून मागविण्यात येत आहेत.

या पुरस्कारांच्या प्रवेशिका खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत उपलब्ध होतील व त्याच कालावधीत चित्रपट प्रवेशिका सादर करता येतील.

- **प्रवेशिका अर्ज मिळण्याचे ठिकाण** : महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई – ६५ येथे तसेच आवश्यक माहिती **www.filmcitymumbai.org** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- **प्रवेशिका अर्ज सादर करण्याचे ठिकाण** : महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई – ६५

स्वाक्षरी/-
व्यवस्थापकीय संचालक

कर्मचाऱ्यांनी निवडणूक हलक्यात घेऊ नये

जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांचा इशारा; दहा टक्के कर्मचाऱ्यांची प्रशिक्षणाला गैरहजेरी

पुणे : पुढारी वृत्तसेवा

लोकसभा निवडणुकीसाठी कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. यातून आरोग्य, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, बँका, जलसंपदा विभाग, परीक्षा प्रक्रियेत सहभागी असलेले प्राध्यापक, शिक्षक आदी अत्यावश्यक सेवेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांना वगळण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी स्पष्ट केले. चारही मतदारसंघातील नियुक्त कर्मचाऱ्यांपैकी १० टक्के म्हणजेच सुमारे सहा हजार कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणासाठी दांडी मारली आहे, त्यांनी हलक्यात घेऊ नये, असा इशारा त्यांनी मंगळवारी दिला.

निवडणूक कामकाज आढाव्याची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत जिल्हाधिकारी डॉ. दिवसे बोलत होते. ते म्हणाले, जिल्ह्यातील चारही लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकांच्या कामांसाठी नगरपालिका, नगरपंचायत, महानगरपालिका, बँका तसेच राज्य आणि केंद्र सरकारच्या अखत्यारीतील विविध कार्यालयांमधील कर्मचारी नियुक्त केले आहेत. कर्मचाऱ्यांना पहिले प्रशिक्षण देण्यात आले. दुसरे प्रशिक्षण लवकरच देण्यात येईल. अनुपस्थित कर्मचाऱ्यांना नोटिसा पाठविण्याची कारवाई करणार आहे.

दरम्यान, अत्यावश्यक सेवा वगळता इतर शासकीय विभागांमध्ये कार्यरत असणारे अधिकारी, कर्मचारी यांना खरोखरीच आरोग्यविषयक त्रास, शारीरिक व्याधी किंवा पूर्वनियोजित कामासाठी बाहेरगावी किंवा परदेशात जायचे असल्यास अशा कर्मचाऱ्यांची शहानिशा करून त्यांना वगळण्यात येईल. आतापर्यंत कोणत्याही कर्मचाऱ्याला निवडणूक कामकाजातून वगळण्यात आल्याचे आदेश काढण्यात आलेले नाहीत किंवा संबंधित कर्मचाऱ्यांना तसे सांगण्यात आलेले नाही, असेही जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांनी स्पष्ट केले.

कार्यपालक अभियंता का कार्यालय
पथ निर्माण विभाग, पथ प्रमंडल,जामताड़ा

शुद्धि पत्र
ई–प्रोक्योरमेंट सूचना सं0 –05 / 2023–24

PRNo.-321927 Road (23-24) D & PR No.-322871 Road (23-24)-D के द्वारा प्रकाशित निविदा में वेबसाईट पर प्रकाशन की तिथि अपरिहार्य कारणवश 28.03.2024 के स्थान पर 24.04.2024 एंव ई –निविदा प्राप्त करने की अंतिम तिथि 23.04.2024 के स्थान पर 22.05.2024 संशोधित जाती है। शेष शर्ते यथावत रहेंगें।

कार्यपालक अभियंता,
पथ निर्माण विभाग,
पथ प्रमंडल, जामताड़ां

PR 323846 Road(24-25).D

पुढारी ANCHOR

अवकाळीचा पिकांना तडाखा

८२ हजार २६४ हेक्टर बाधित : अमरावतीमध्ये सर्वाधिक नुकसान

पुणे : पुढारी वृत्तसेवा

राज्यात एप्रिल महिन्यात होत असलेल्या अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि गारपिटीमुळे २१ जिल्ह्यांतील सुमारे ८२ हजार २६४ हेक्टरवरील पिकांना फटका बसला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने विदर्भ-मराठवाड्यातील पिकांचा समावेश असल्याचे कृषी विभागाच्या ताज्या अहवालात नमूद केले आहे.

सर्वाधिक नुकसान अमरावती जिल्ह्यात झाले असून, ते तब्बल ५३ हजार ४०२ हेक्टरवरील आहे. या शिवाय अन्य जिल्ह्यांतील शेतीपिके व फळपिकांचे झालेले नुकसान हेक्टरमध्ये पुढीलप्रमाणे : सोलापूर १४४७, नंदुरबार १२२, छत्रपती संभाजीनगर १६३, जालना १३४, धाराशीव ३०८, बीड १०२१, लातूर ९५, नांदेड ७४९, परभणी ३, हिंगोली २९७, वाशिम ३८८८, बुलढाणा ६५१३, अकोला १११५७, यवतमाळ २४९४, वर्धा ३०८, नागपूर ९०, भंडारा १३, गोंदिया ४५, चंद्रपूर ४, गडचिरोली ११ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे.

नुकसानीमध्ये प्रामुख्याने केळी, पपई, टरबूज, उन्हाळी ज्वारी, बाजरी, मका, कांदा, भाजीपाला, आंबा, चिकू, लिंबू, गहू, मूग, हरभरा, तीळ, संत्रा, भात आदी शेती पिके व फळपिकांचे नुकसान झाले आहे. दरम्यान, अवकाळी पावसाने अन्य जिल्ह्यांतही शिरकाव केला आहे. त्यामुळे पिकांच्या नुकसानीचा आकडा वाढण्याचा अंदाज कृषी विभागाच्या सूत्रांनी व्यक्त केला.

गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड
(पूर्वी पूनावाला हाऊसिंग फायनान्स लि. म्हणून ओळख)

नोंदणीकृत कार्यालय : ६०२, ६वा मजला, झिरो वन आयटी पार्क, एसआर क्र. ७९/१, घोरपडी, मुंढवा रोड, पुणे–४११०३६. शाखा कार्यालय युनिट : ऑफीस क्र. ओमकार प्लाझा, १ला मजला, एफ४, राजाराम रोड, बागल चौक, कोल्हापूर, महाराष्ट्र–४१६००१

ई–लिलाव–विक्री सूचना
एसएआरएफएईएसआय कायद्यांतर्गत तारण स्थावर मालमत्तेची विक्री

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ ("कायदा")सह सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२च्या नियम ८ आणि ९ च्या तरतुदीनुसार स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी ई–लिलाव विक्री सूचना

सर्वसाधारण लोक आणि विशेषत: कर्जदार/सह–कर्जदार/गहाणवटदार/ जामीनदार यांना सूचना देण्यात येते की खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्ता या गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (पूर्वी पूनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळख पूनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेडचे नाव १७ नोव्हें. २०२३ पासून गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड असे बदलण्यात आले जे पूर्वी मॅग्मा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड होते आणि मूलत: जीई मनी हाऊसिंग फायनान्स पब्लिक अनलिमिटेड कंपनी या नावाने स्थापित झाली) (यापुढे कायद्यानुसार "सिक्युअर्ड क्रेडीटर" म्हणून उल्लेख) यांच्याकडे गहाण आहेत, त्यांचा **ताबा** कायद्याच्या कलम १३(१२) सह सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियमांच्या नियम ८ आणि ९ नुसार कायद्याच्या मिळालेल्या अधिकारांचा वापर करत कलम १३(२) अंतर्गत सूचनेनुसार सिक्युअर्ड क्रेडीटर चे अधिकृत अधिकारी यांनी घेतला आहे.

तारण मालमत्ता **"जशी आहे तिथे आहे", "जी आहे काय आहे," आणि "जे आहे ते आहे"** बेसिसवर ०३/०५/२०२४ रोजी वेबसाईट : https://www.bankauctions.com वर पुरवण्यात आलेल्या ई–लिलाव व्यासपीठावर होणार आहे. विक्रीच्या तपशीलवार शर्ती आणि अटींसाठी कृपया जीएचएफएल/सिक्युअर्ड क्रेडीटर्स यांची वेबसाईट म्हणजे www.grihumhousing.com मध्ये दिलेली लिंक पहा.

अनु. क्र.	प्रस्ताव क्र. ग्राहकाचे नाव (अ)	मागणी सूचना दिनांक आणि थकीत रक्कम (ब)	ताब्याचे स्वरूप (क)	मालमत्तेचे वर्णन (ड)	राखीव मूल्य (ई)	बयाणा रक्कम (राखीव मूल्याच्या १०%)(फ)	बयाणा रक्कम भरण्याचा दिनांक (ग)	बोली वाढवण्याची रक्कम (ह)	मालमत्ता तपासणीचा दिनांक आणि वेळ (इ)	लिलावाचा दिनांक आणि वेळ (ज)	माहित असलेले भार/असल्यास न्यायालयीन खटले (क)
१	कर्ज क्र. एचएफ/०१२४/एच/२०/१०००७३ संकेत तानाजी पोवार (कर्जदार), राणी तानाजी पोवार (सह कर्जदार) तानाजी शंकरराव पोवार (सह कर्जदार)	सूचना दिनांक : २५/०८/२०२२ रू. १०६४२८३.१६ (रूपये दहा लाख चौसष्ट हजार दोनशे त्र्याऐंशी आणि सोळा पैसे फक्त) २५/०८/२०२२ रोजीप्रमाणे १५.००% दराने व्याजासहीत मुदत संपेपर्यंत देय असलेली	प्रत्यक्ष	दुकान क्र. ०७ मोजमाप २७.८७ चौ. मी. म्हणजे ३०० चौ. फू. ग्राम पंचायत मिळकत क्र. ४६८४ जे गट क्र. १०७२ मधील प्लॉट क्र. ०२ वर बांधण्यात आलेल्या कोणार्क कॉम्पलेक्सच्या पहिल्या मजल्यावर असून ग्रामपंचायत कसबा कोडोली, तालुका पन्हाळा, जिल्हा–कोल्हापूर च्या हद्दीत स्थित या गहाण मालमत्तेचा एकूण एक भाग	रू. १०,००,००० /– (रूपये दहा लाख फक्त)	रू. १,००,०००/– (रूपये एक लाख फक्त)	२५/०४/२०२४ रोजी सायं. ५ पूर्वी	१०,०००/–	२६/०४/२०२४ (सकाळी ११–दुपारी ४)	०३/०५/२०२४ (सकाळी ११–दुपारी २)	नाही
२	कर्ज क्र. एचएफ/०१२४/एच/२०/१००१५६ संकेत तानाजी पोवार (कर्जदार), राणी तानाजी पोवार (सह कर्जदार) तानाजी शंकरराव पोवार (सह कर्जदार)	सूचना दिनांक : २५/०८/२०२२ रू. ११०७१२०.०९ (रूपये अकरा लाख सात हजार एकशे वीस आणि नऊ पैसे फक्त) २५/०८/२०२२ रोजीप्रमाणे १५.००% दराने व्याजासहीत मुदत संपेपर्यंत देय असलेली	प्रत्यक्ष	गट क्र. १०७२ मधील प्लॉट क्र. ०२ वर बांधण्यात आलेल्या कोणार्क कॉम्पलेक्समधील दुकान क्र. ०१मोजमाप २७.८७ चौ. मी. म्हणजे ३०० चौ. फू. ग